ISSN : 2393-8900
IMPACT FACTOR : 1.9152 (UIF)

# Historicity

## International Research Journal

UGC APPROVED 62782

VOLUME - IV
Feb. 2018

**SPECIAL ISSUE**

*Theme*

## Contemporary Issues and Challenges in Social Sciences



# INDEX



| | | |
|---|---|---|
| 91 | भारतीय संविधान : समतेचा दस्तऐवज<br>प्रा.तेजस्विता अ.रणश्रृंगारे | 387 |
| 92 | वेरुळची जैन लेणी : शैलस्थापत्याचा उत्कृष्ट आविष्कार<br>प्रा.डॉ.रविकिरण जाधव | 393 |
| 93 | भारतीय स्त्री आणि धम्म :स्त्रीवादी दृष्टीकोनातून एक अभ्यास<br>प्रा. साळुंखे उमेश अशोक | 395 |
| 94 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री कामगारांसाठी केलेले कार्य<br>प्र. प्राचार्य डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण, संजय कांबळे | 397 |
| 95 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक गंभीर समस्या<br>संतोष राठोड | 403 |
| 96 | १९ व्या शतकातील समाजसुधारणेचा अग्रदूत- राजा राम मोहन रॉय व ब्राम्होसमाज<br>Shejul Bappasaheb Ramling | 407 |
| 97 | सावंतवाडी संस्थानातील सण व उत्सव<br>प्रा.डॉ.एस.पी. शिंदे | 409 |
| 98 | एतद्देशीय ख्रिश्चन साहित्यातील मराठी साहित्यकाचे वाङःमयीन कार्यातील योगदान<br>प्रा. अरूण विठ्ठल सोनकाबंळे | 412 |
| 99 | महात्मा गांधीजींचे रचनात्मक कार्यक्रमांविषयीचे विचार<br>प्रा. सुहास पाटील | 414 |
| 100 | हैदराबाद मुक्ती लढ्यातील स्टेट कॉंग्रेसचे कार्य<br>प्रा. सुमन लक्ष्मणराव केंद्रे | 418 |
| 101 | सोलापूर जिल्ह्यातील ख्रिश्चन मशिनरीचे शैक्षणिक कार्य<br>प्रा. युवराज सुरवसे | 421 |
| 102 | महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची संख्यात्मक वाढ व गुणात्मक वाढ या विषयी तुलना : एक अभ्यास<br>प्रा. के.टी. व्हनहुवे | 423 |
| 103 | विमुद्रीकरण एक भ्रष्टाचाराशी लढा<br>वनिता नागनाथ गोतसुर्वे | 425 |
| 104 | काळा पैसा आणि विमुद्रीकरण<br>विपूला मिलिंद नायडू | 428 |
| 105 | "महात्मा गौतम बुद्धाचा वर्णव्यवस्थाविरोधी विचार"<br>प्रा. दिगंबर शिवाजी वाघमारे | 431 |
| 106 | स्त्री शिक्षण आणि दादासाहेब गायकवाड<br>प्रा.डॉ. वाघमारे विष्णु बब्रुवान | 435 |
| 107 | सोलापूर जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शेतमाल विपणन कार्यपध्दतीच्या समस्यांचा अभ्यास करणे.<br>प्रा. रामनाथ मोरे | 438 |
| 108 | युनोचा मानवी हक्कविषयक जाहीरनामा आणि भारतीय संविधानातील कलमे<br>प्रा.किर्तीकर वाल्मीक भीमराव | 443 |
| 109 | समाज कल्याणासाठी कल्याणकारी योजनेचा सर्वेक्षणात्मक अभ्यास<br>श्री. वाघमोडे व्ही.व्ही. | 445 |
| 110 | भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांचा राजकीय सहभाग<br>प्रा.गायकवाड संजय सभाजीराव | 451 |
| 111 | जनसामान्यांचे असामान्य नेतृत्व भाई गणपतराव देशमुख,<br>प्रा.डॉ.शिवाजी वाघमोडे, | 455 |
| 112 | शिरुर तालुक्यातील शेतकरी उठाव (१८७५.७६)<br>प्रा.हरिदास शंकर जाधव | 461 |
| 113 | Re-engineering Library & Information Services in new Era<br>Dr. Mrs. Vandana Santosh Gavali | 464 |
| 114 | A Study on Employees Training Needs in Bijjaragi Company Vijaypur<br>Ashwini Sannakki and Poornima | 467 |
| 115 | The ins & outs of In branding in India<br>Mr. Vijayakumar Jadhav | 474 |
| 116 | Globalization, Poverty and Inequalities<br>Dr. Prakash A. Malaganve | 480 |
| 117 | Panchayat Raj: Historical Development And Modern Implications<br>Mr. Shriniwas Bhandare | 484 |
| 118 | Information Services in Academic Libraries<br>V.B. Mane | 490 |
| 119 | Impact of GST on Small & Medium Enterprises (SMEs)<br>Ms.Snehal D. Bhosale | 493 |
| 120 | Teaching Social Work Practice Through Intervention Field Work<br>Dr. Gangadhar B. Sona... | 498 |

ISSN : 2393-8900
Impact Factor : 1.9152(UIF)

# महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची संख्यात्मक वाढ व गुणात्मक वाढ या विषयी तुलना : एक अभ्यास

**प्रा. के.टी. व्हनहुवे**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय,
तालुका : बार्शी, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र

**सारांश :-**
महाराष्ट्रातील सहकारी संस्थांमधील भ्रष्टाचार व असमतोल दूर केल्यास तसेच सहकारी क्षेत्रातील नियमांची काटेकोर अंमलबजावणी केल्यास 'विनासहकार नही उध्दार' या घोषवाक्याची खऱ्या अर्थाने परिपूर्ती होईल यात शंका नाही.

**प्रस्तावना :-**
महाराष्ट्राच्या विकासाला आकार व दिशा देण्यामध्ये सहकार क्षेत्राचा मोठा वाटा आहे. सहकार क्षेत्रातील मुलभूत उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून स्व. यशवंतराव चव्हाण यांनी सहकार चळवळ गतीमान केली. स्व.वसंतदादा पाटील यांनी ती वाढविली आणि कृषिमंत्री शरद पवार यांनी ती रुजविली. यातूनच सहकार म्हणजे महाराष्ट्र असे चित्र गेल्या ५० वर्षात निर्माण झाले आहे, परंतू ही वाढ गुणात्मक आहे की संख्यात्मक हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे, म्हणूनच संशोधकाने वरील विषयाची निवड केले आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**
१. सहकारी चळवळीच्या संख्यात्मक वाढीचा अभ्यास करणे.
२. सहकारी चळवळीमुळे झालेल्या रोजगारनिर्मिती क्षमतेचा, कार्यक्षमतेचा, आर्थिक प्रगतीचा म्हणजेच गुणात्मक वाढीचा अभ्यास करणे.
३. संख्यात्मक वाढ वा गुणात्मक वाढ यांची तुलना करून आवश्यक शिफारशी सुचविणे.

**गृहितके :-**
१. महाराष्ट्र राज्यात सहकार चळवळ कार्यक्षम आहे.
२. राज्यातील सहकार चळवळीने राज्यांच्या विकासात भर पडली आहे.

*** महाराष्ट्रातील सहकार चळवळ संख्यात्मक वाढ**
देशपातळीवर संमिश्र अर्थव्यवस्थेत सहकारी कृषी औद्योगिक समाजरचनेचा नवा व्यावहारिक मार्ग काढुन वर्षानुवर्षे सरंजामी व सावकारी तटबंदीत अडकून पडलेल्या अर्थव्यवस्थेला त्या तटबंदी फोडून सहकारी चळवळीने प्रमाणित केले. देशातील पहिला सहकारी कायदा १९०४ साली अस्तित्वात आला तर महाराष्ट्रातील सहकारी कायदा हा १९६० साली पारित करण्यात आल. संपूर्ण भारतामध्ये जवळजवळ ५ लाख सहकारी संस्था असून त्यामध्ये २४ कोटी सभासद आहेत. यामध्ये ८४ टक्के खेडेगावातील संस्थांचा समावेश आहे. सस्थांमध्ये गुंतलेले खेळते भांडवल २ लाख कोटी आहे. राष्ट्रीय लोकसंख्येच्या २० टक्के जनता या चळवळीशी थेट संबंधित आहे.

**सहकारी संस्थांची महाराष्ट्रातील संख्या**

| अ.क्र. | संस्था प्रकार | संस्था |
|---|---|---|
| १. | शिखर मध्यवर्ती सहकारी बँका | ३१ |
| २. | नागरी सहकारी बँका | ५१७ |
| ३. | कार्यकारी सहकारी संस्था | २१,३८४ |
| ४. | पतसंस्था | १५,५७५ |
| ५. | गृहनिर्माण संस्था | ८५,३३५ |
| ६. | पणन संस्था | १,४७४ |
| ७. | जिनिंग प्रोसोसिंग संस्था | २७१ |
| ८. | इतर सहकारी संस्था | ८९७८० |

**एकूण २,१४,५६९**

ISSN : 2393-8900
Impact Factor : 1.9152(UIF)

**महाराष्ट्र सहकार चळवळ संख्यात्मक बाब**

| अ.क्र. | वर्ष | १९९१ | २०११ |
|---|---|---|---|
| १. | एकूण सहकारी संस्था | १,०४,६२० | २,१२,३४४ |
| २. | एकूण सभासद (लाखात | २७० | ५१७ |
| ३. | भाग भांडवल (कोटीत) | १,९५७ | १४,९६९ |

१. १९९१ या वर्षाच्या तुलनेत २०११ या वर्षी सहकारी संस्थेत सुमारे दुपटीने वाढ झाली आहे.
२. १९९१ च्या तुलनेत २०११ या वर्षी सभासद संख्येत सुमारे दुपटीने वाढ झाली आहे.
३. १९९१ च्या तुलनेत भाग भांडवलात सुमारे १४ पटीने वाढ झाली आहे.

**महाराष्ट्र सहकारी क्षेत्रातील गुणात्मक बाबी**

(रक्कम कोटी रुपयांमध्ये)

| अ.क्र. | तपशील | १९९१ | २०११ |
|---|---|---|---|
| १. | ठेवी | ११,०४८ | १,१८,०२४ |
| २. | कर्जवाटप | ६,३०० | ८२,५५६ |
| ३. | थकीत कर्ज | २,१२४ | ७,१७४ |
| ४. | रोजगार निर्मिती | ३.९४ | ३.६४ |

१. १९९१ च्या तुलनेत २०११ या वर्षी ठेवींमध्ये सुमारे १० पटीने वाढ झालेली दिसून येते.
२. १९९१ च्या तुलनेत २०११ वर्षामध्ये कर्जवाटपात सुमारे १२ पटीने वाढ झालेली दिसून येते.
३. १९९१ च्या तुलनेत २०११ या वर्षामध्ये थकीत कर्जामध्ये सुमारे ०३ पट वाढ झाली आहे.
४. १९९१ या वर्षाच्या तुलनेत २०११ या वर्षामध्ये एकूण रोजगार निर्मितीत ०.३०० घट झालेली आहे.

**निष्कर्ष :-**

१. नोंदणी झालेल्या सहकारी संस्था जास्त परंतू प्रत्यक्ष काम करणाज्या संस्थांचे प्रमाण कमी आहे.
२. सहकारी संस्थामधील अकार्यक्षमता, थकबाकी, भ्रष्टाचार, नियम न पाळण्याची वृत्ती या गोष्टी सहकारास मारक आहेत.
३. सहकारी संस्थेत संख्यात्मक वाढ मोठ्या प्रमाणात झाली असून गुणात्मक वाढ अत्यंत अल्प झाली आहे.

**शिफारशी :-**

१. शासकीय व निमशासकीय संस्थांचे सहभागातून सहकारी चळवळ व त्यासाठी जरुर असणारा सुशिक्षित, प्रशिक्षित व समर्पित भावनेचा कर्मचारी वर्ग आणावा.
२. आजारी सहकारी संस्थांचे सक्षम बलाढय सहकारी संस्थेत विलनीकरण करण्यात यावे.
३. राजकीय हस्तक्षेपाचे निर्मुलन व सहकारी संस्थांचे सबलीकरण या दृष्टिकोनातून धोरण असावे.
४. महिलांसाठी स्वतंत्र सहकारी संस्थांची निर्मिती करणेबाबत काही धोरणात्मक बदल करावेत.
५. शेतीमाल आयात-निर्यात करणाज्या सहकारी संस्थाची निर्मिती करावी.

**संदर्भ सूची :-**

१. दुरुस्त सहकार कायदा: सुधारणांना वाव, नंदकुमार रेंगे : लोकसत्ता, २३ मार्च २०१३
२. महाराष्ट्र व सहकार, प्रासंगिक, संपादकीय, दै. पुढारी दि.२५ फेब्रुवारी २०१६
३. महाराष्ट्रातील सहकार चळवळ- महाराष्ट्र राज्य पुणे, २००९ व २०१०
४. डॉ. गुप्ता, बी.पी.भारत में सहकारिता के सिध्दांत एवं व्यवहार, बी.डी.पब्लिकेशन जयपुर, नई दिल्ली.
५. महाराष्ट्र राज्याची आर्थिक पाहणी २००९ ते २०१५